मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# अनधिकृत 'आरएमसी प्लॅन्ट'वर कारवाई!

## हवा आणि ध्वनी प्रदूषणास कारणीभूत ठरत असल्याने कारवाई : पुनावळे आणि चिखलीत महापालिकेची पाहणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरात अनधिकृतपणे सुरु असलेल्या तसेच हवा आणि ध्वनी प्रदूषणास कारणीभूत ठरत असलेल्या आर.एम.सी. (रेडीमिक्स क्रॉंक्रीट) प्लॅन्ट वर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी करून कारवाई करण्यात आली.

शहरातील आर.एम.सी. (रेडीमिक्स क्रॉंक्रीट) प्लॅन्ट मधून मोठ्या प्रमाणात उडणा-या धूळीमुळे नागरिकांना श्वसनाचा तसेच त्या प्रकल्पांमधून निघणाऱ्या आवाजामुळे ध्वनी प्रदूषणाचा त्रास होत असून त्याबाबत महापालिकेच्या पर्यावरण विभागास तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींची दखल घेऊन महापालिकेने मे.एस.व्ही.टी.एन.कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. तर्फे सोमानी टॉवर्स, प्लॉट नं. २५, गायकवाडनगर, पुनावळे पुणे तसेच ऐश्वर्यम हमारा, आर.एम.सी. (रेडीमिक्स क्रॉक्रीट) प्लॅन्ट चिखली येथे प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडील तसेच महापालिकेकडील ना-हरकत दाखला व इतर अनुषंगिक आवश्यक असणारी परवानगी घेणे अनिवार्य असते. परंतु पाहणीवेळी ही परवानगी न घेता अनधिकृतपणे व्यवसाय चालवित असल्याचे तसेच नागरिकांनी केलेल्या तक्रारींमध्ये तथ्य असल्याचे महापालिकेच्या पथकास निदर्शनास आले आहे.

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली २२ एप्रिल २०२४ रोजी पर्यावरण पथकातील प्रदीप महाले, जगन्नाथ काटे, बाबासाहेब ढोकळे, कनिष्ठ अभियंता स्वप्निल पाटील, मल्टिपर्पज वर्कर गोरक्षनाथ करपे तसेच एमएसएफ व मेस्को जवानांच्या पथकाने प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी करून कारवाई केली.



### फौजदारी कारवाईचा इशारा

» पुनावळे येथील मे.एस.व्ही.टी.एन.कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. तर्फे सोमानी टॉवर्स तसेच चिखली येथील मे. ऐश्वर्यम हमारा येथे सुरु असलेला आर.एम.सी. (रेडीमिक्स क्रॉक्रीट) प्लॅन्ट सील करण्यात आला आहे. यापुढे महापालिकेच्या हद्दीत विनापरवाना व्यवसाय आणि वायू, ध्वनी प्रदूषण करत असल्याचे निदर्शनास आल्यास फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

# महापालिकेच्या शाळेला 1 कोटी 88 लाखांचा निधी मिळणार

## महापालिकेच्या थेरगाव माध्यमिक विद्यालयाची निवड : पुणे जिल्ह्यातील 15 शाळांची निवड

**पिंपरी | प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या तज्ज्ञ समितीकडून पीएम स्कूल्स फॉर रायझिंग इंडिया (पीएमश्री) योजनेंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या थेरगाव माध्यमिक विद्यालयाची निवड झाली आहे. शाळेला या माध्यमातून 1 कोटी 88 लाख रुपयांचा निधी मिळणार आहे.

पीएम स्कूल्स फॉर रायझिंग इंडिया (पीएमश्री) योजनेंतर्गत, दुसऱ्या टप्प्यात पुणे जिल्ह्यातील 15 शाळांची निवड झाली आहे. येत्या काळात या शाळांचा 'आदर्श शाळा' म्हणून विकास केला जाणार आहे. या शाळांमध्ये 'आयसीटी लॅब', 'डिजिटल लायब्ररी', 'स्मार्ट क्लासरूम्स' तयार करण्यात येणार आहेत.

तसेच विद्यार्थ्यांना टॅब देण्यात येणार आहेत. पीएमश्री शाळा योजनेंतर्गत थेरगाव माध्यमिक विद्यालयाची निवड झाल्याबद्दल महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे, सहायक




आयुक्त विजय कुमार थोरात, शिक्षणाधिकारी संगीता बांगर यांनी विद्यालयाचे मुख्याध्यापक बाबासाहेब राठोड यांचे अभिनंदन केले आहे.

शाळेमध्ये अधिकाधिक प्रायोगिक आणि एकात्मिक पद्धतीने इनडोअर व आउटडोअर उपक्रम शिकवले जाणार आहेत. शाळांमध्ये 'डिस्कव्हरी ओरिएंटेड' आणि 'लर्निंग सेंट्रिक टीचिंग मेथड' राबविण्यात येणार आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# पुणे आरटीओत 'काळाबाजार'

## दलालांनी उभारली पर्यायी यंत्रणा : कर्मचाऱ्यांना धमकावण्याचे प्रकार सुरू

**पुणे | प्रतिनिधी**

वाहनाला आकर्षक नोंदणी क्रमांक मिळविण्यासाठी लाखो रुपयांचा खर्च करणाऱ्या पुणेकरांची संख्या वाढली आहे. याचाच फायदा घेत प्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) या क्रमांकांचा काळाबाजार सुरू झाला आहे. यासाठी आरटीओतील दलालांनी पर्यायी यंत्रणा उभारली असून, प्रसंगी कर्मचाऱ्यांनाही धमकावण्याचे प्रकार सुरू आहेत.

महागडी मोटार खरेदी केल्यानंतर तिला क्रमांकही आवडीचा हवा, अशी अनेकांची हौस असते. त्यासाठी लाखो रुपयांचा खर्च करण्याची त्यांची तयारी असते. यामुळे आरटीओकडून आर्थिक वर्ष २००४-०५ पासून आकर्षक क्रमांकांचा लिलाव करण्यास सुरुवात झाली. त्यातून प्रादेशिक परिवहन कार्यालयाला मिळणारा महसूल वर्षानुवर्षे वाढत आहे. आरटीओला आकर्षक वाहन नोंदणी क्रमांकातून आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये सुमारे ५० कोटी रुपयांचा महसूल मिळाला आहे. आकर्षक वाहन क्रमांकाच्या लिलाव प्रक्रियेत आता दलालांचा शिरकाव झाला आहे. त्यांच्याकडून या क्रमांकाचा काळाबाजार सुरू आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

आकर्षक क्रमांकासाठी सुरुवातीला क्रमांकनिहाय निश्चित केलेले शुल्क भरावे लागते. हे शुल्क धनाकर्षाद्वारे भरावे लागते. आरटीओतील दलालांनी यासाठीच्या धनाकर्षाची बेकायदा विक्री सुरू केली आहे. समोरच्या व्यक्तीला किती तातडीची गरज आहे, त्यानुसार या धनाकर्षाची किंमत वाढत जाते. आरटीओत अनेक दलाल अशा धनाकर्ष विक्रीत गुंतलेले आहेत. आकर्षक क्रमांकासाठी अर्ज करणारेही काही दलाल आहेत. लिलावावेळी हे दलाल ठरावीक आकर्षक क्रमांकासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीला गाठतात. त्याच्याकडे पैशाची मागणी करतात. त्याने पैसे न दिल्यास लिलावात बोली लावून तो क्रमांक खरेदी करून दुसऱ्या व्यक्तीला विकण्याची धमकी देतात. याचबरोबर ठरावीक क्रमांकासाठी आरटीओतील कर्मचाऱ्यांवरही दबाव आणला जातो, असे सूत्रांनी सांगितले.



> आकर्षक क्रमांकाची लिलाव प्रक्रिया ऑनलाइन करण्यासाठी महाराष्ट्र मोटार वाहन नियमावलीत दुरुस्ती करावी लागेल. अर्ज भरण्याची प्रक्रिया ऑनलाइन करण्याचा विचार सध्या सुरू आहे.
>
> **- संजीव भोर, प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी.**

### रात्रीपासून आरटीओमध्ये ठाण मांडून

आकर्षक क्रमांकाचा लिलाव झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी वाहन क्रमांकाची नवीन मालिका सर्वांसाठी खुली होते. त्यात लिलावात न गेलेले आकर्षक क्रमांक असतात. ही मालिका खुली होण्याच्या आधीच्या रात्रीपासून अनेक जण कार्यालयात रांग लावतात. मालिकेतील लिलावात न गेलेल्या आकर्षक क्रमांकांची खरेदी करण्यासाठी दलाल रात्रभर कार्यालयात ठाण मांडून बसतात. नंतर सकाळी या क्रमांकाची खरेदी करून त्याची विक्री इतरांना जास्त पैसे घेऊन केली जाते, असे सूत्रांनी स्पष्ट केले.


# साडेचार दशकांनंतर रेसकोर्सवर पंतप्रधानांची सभा

## पंतप्रधान मोदींच्या सभेसाठी पुणे रेसकोर्स स्थळ जवळपास निश्चित : पोलिसांकडूनही स्थळाची पाहणी

**पुणे | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेसाठी आता पुणे रेसकोर्स हे नवे स्थळ जवळपास निश्चित झाले आहे. येथे सभा झाली, तर या ठिकाणी तब्बल साडेचार दशकांनंतर पंतप्रधानांची सभा होईल. यापूर्वी इंदिरा गांधी पंतप्रधान असताना, त्यांची जानेवारी १९७२ मध्ये आणि नंतर १९७७ मध्ये पुणे रेसकोर्सवर सभा झाली होती.

पंतप्रधानांची पुढील सोमवारी (२९ एप्रिल) पुण्यात सभा होणार आहे. ही सभा आधी स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर नियोजित होती. मात्र, आता स्थळ बदलण्यात येत आहे. पुणे रेसकोर्स हे स्थळ हडपसर भागात बारामती, शिरूर आणि पुणे या तीन लोकसभा मतदारसंघांच्या परिघावर आहे. त्यामुळे या सभेला 'राजकीय' महत्त्व प्राप्त झाले आहे.



'जास्तीत जास्त लोकांना बसता येईल, अशा दृष्टीने रेसकोर्सवर सभा घेण्याचे नियोजन करण्यात येत आहे. पोलिसांनीही स. प. महाविद्यालय मैदान किंवा खडकवासला येथील एखाद्या ठिकाणाऐवजी रेसकोर्सच्या स्थळाबाबत सकारात्मकता दर्शवली,' असे भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी 'लोकसत्ता'ला सांगितले. पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांबरोबर मंगळवारी सायंकाळी रेसकोर्सची पाहणीही केली.

### बांगलादेश युद्धानंतरच्या सभेला अभूतपूर्व प्रतिसाद

'पुणे रेसकोर्सचे मैदान प्रचंड मोठे आहे. या ठिकाणी बांगलादेश युद्ध जिंकल्यानंतर जानेवारी १९७२ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची सभा झाली होती. त्याला अभूतपूर्व प्रतिसाद आणि अलोट गर्दी झाली होती. या सभेच्या तयारीत मी स्वत: सक्रिय होतो. युद्ध जिंकल्यानिमित्त त्या वेळी ज्येष्ठ कवी-गीतकार ग. दि. माडगूळकर यांनी एक गीत तयार केले होते. त्याला वसंत देसाई यांनी संगीत दिले होते. फैयाज, वाणी जयराम, जयवंत कुलकर्णी आदींनी ते सभेच्या वेळी सादर केल्याचेही मला स्मरते,' अशी आठवण काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हास पवार यांनी सांगितली. 'सन १९७७ च्या निवडणुकीच्या वेळीही इंदिरा गांधी यांची रेसकोर्सवर सभा झाली होती. त्यानंतर या मैदानावर पंतप्रधानांची ही पहिलीच सभा ठरेल,' असे जाणकार सांगतात.

# शहरात लाखोंची रोकड जप्त

## आचारसंहिता काळात नाकाबंदीत वाहनातील बेकायदेशीर रक्कम जप्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे शहरात शनिवार वाड्याजवळ एका व्यक्तीकडून ३ लाख ८० हजार रुपये जप्त करण्यात आले. २२ एप्रिल रोजी दुपारी पथकाने ही कारवाई केली. रोकड रक्कम घेऊन जाणाऱ्या व्यक्तीला त्याबाबत काहीच स्पष्टीकरण देता आले नाही. यामुळे ती रक्कम जप्त करुन कोषागार कार्यालयात जमा केली.

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता देशभरात सुरु आहे. या आचारसंहिता काळात रोख रक्कम बाळगण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत. आचारसंहिता काळात निवडणूक आयोगाचे पथक, पोलीस अन् आयकर विभागाची नजर बेकायदेशीर रक्कम बाळगण्यावर आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये बेकायदेशीर रक्कम नेणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. पिंपरी चिंचवडमध्ये 25 लाखांची रोकड जप्त करण्यात आली मंगळवारी सव्वा दहाच्या सुमारास वाकड हद्दीत ही कारवाई करण्यात आली. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने लावण्यात आलेल्या नाकाबंदीत एका वाहनात ही रक्कम आढळली. पुणे शहरात शनिवारवाडाजवळ ३ लाख ८० हजार रुपये जप्त करण्यात आले.



### आयकर विभाग करणार तपास

लोकसभा निवडणूक काळात वाकडमध्ये सापडलेली रक्कम पथकाने जप्त करुन कोषागार कार्यालयात जमा केली आहे. या प्रकरणाचा तपास आयकर विभाग करणार आहे. त्यावेळी ही रक्कम एखाद्या उमेदवाराची आहे का? असेल तर तो कोणत्या पक्षाचा उमेदवार आहे? की ही रक्कम त्या व्यक्तीची स्वतःची आहे का? या प्रश्नांची उत्तरे आयकर विभागाच्या तपासात निष्पन्न होणार आहे.

पुणे शहरात शनिवार वाड्याजवळ एका व्यक्तीकडून ३ लाख ८० हजार रुपये जप्त करण्यात आले. २२ एप्रिल रोजी दुपारी पथकाने ही कारवाई केली. रोकड रक्कम घेऊन जाणाऱ्या व्यक्तीला त्याबाबत काहीच स्पष्टीकरण देता आले नाही. यामुळे ती रक्कम जप्त करुन कोषागार कार्यालयात जमा केल्याची माहिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी स्नेहा देवकाते यांनी दिली.

१८ एप्रिलपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली. त्यामुळे मतदार संघात राजकीय हालचाली वेगात सुरू झाल्या आहेत. उमेदवारांकडून जोरदार प्रचार सुरू आहे. त्यासोबतच प्रशासनाने देखील जोरदार तयारी केली आहे. यात नाकाबंदी करण्यात येत आहे.

निवडणूक विभाग आणि पिंपरी चिंचवड पोलिसांच्या संयुक्त पथकाकडून नाकाबंदी सुरू होती. त्यावेळी मुंबईकडून वाकडच्या दिशेने एक चारचाकी गाडी येत होती. पथकाने गाडीची तपासणी केली. त्यावेळी गाडीत रोकड मिळून आली. गाडीतील व्यक्ती व्यावसायिक असल्याचे सांगत असून त्याला त्याच्याकडे असलेल्या रोख रकमेबाबत माहिती देता आली नसल्याने या व्यक्तीची रोकड आणि गाडी जप्त करण्यात आली आहे.

पोलिसांनी निवडणूक आयोग आणि आयकर विभागाला घटनास्थळी पाचारण केले असून याबाबत चौकशी केली जाणार आहे.

### कशी करण्यात आली कारवाई

» पिंपर चिंचवडमध्ये निवडणूक आयोगाचे कर्मचारी आणि पोलिसांच्या पथकाची गस्त सुरु होती. गस्त सुरु असताना वाहनांची तपासणी केली जात होती. वाकड हद्दीत एका वाहनाची तपासणी करताना रक्कम आढळून आली. त्यासंदर्भाच विचारणा केल्यावर संबंधिताना उत्तर देता आले नाही. ऐन लोकसभा निवडणुकीच्या काळात ही रक्कम आढळल्याने पथकाने ती जप्त केली. ज्याच्याकडून रक्कम जप्त करण्यात आली ते संबंधित व्यक्ती स्थानिक असल्याची माहिती निवडणूक आयोगाकडून देण्यात आली आहे.

---

# मान्यवरांच्या भेटीसह बारणेंचा तळेगावात प्रचार

## तळेगाव दाभाडेतील मान्यवरांची भेट घेऊन त्यांना सहकार्याचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

ज्येष्ठ नेते माजी आमदार कृष्णराव भेगडे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचे आशीर्वाद घेत मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना- भाजप- राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय- रासप व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी काल (मंगळवारी) रात्री तळेगाव दाभाडे शहरातील काही मान्यवरांची भेट घेऊन त्यांना सहकार्याचे आवाहन केले.



खासदार बारणे यांच्या तळेगाव दाभाडे दौऱ्यात त्यांच्यासमवेत माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, भाजप किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश भेगडे, मावळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, माजी तालुकाध्यक्ष बबनराव भेगडे, भाजपचे प्रचार प्रमुख रवींद्र भेगडे, भाजपचे शहराध्यक्ष अशोक दाभाडे, माजी नगराध्यक्ष चित्रा जगनाडे तसेच प्रशांत ढोरे, गुलाबराव म्हाळसकर, संतोष भेगडे, अरुण माने, नवनाथ हारपुडे, सुनील मोरे आदी पदाधिकारी होते.

माजी नगरसेवक अरुण माने, माजी नगराध्यक्ष श्रीमंत सरदार अंजलीराजे दाभाडे, सामाजिक कार्यकर्ते रशीदभाई शिकीलकर, कलापिनीचे विश्वस्त डॉ. अनंत परांजपे, सामाजिक कार्यकर्ते संकेत खळदे, नामवंत उद्योजक इंदरशेठ ओसवाल, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या अध्यक्ष शैलाताई कैलास काळोखे, श्रीमंत सरदार सत्यशीलराजे दाभाडे, माजी नगराध्यक्ष सुरेश धोत्रे व कृष्णा कारके आदी मान्यवरांच्या निवासस्थानी खासदार बारणे यांनी सदिच्छा भेट दिली. ठिकठिकाणी फटाके वाजवून व औक्षण करून त्यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. तळेगाव दाभाडे येथील मारुती व शनी मंदिरात जाऊन बारणे यांनी दर्शन घेतले.

### सत्कार केला व निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या

» तळेगाव दाभाडे येथील मारुती व शनी मंदिरात जाऊन बारणे यांनी दर्शन घेतले. कडोलकर कॉलनी येथील गुर्जर क्षत्रीय समाज मंदिर ट्रस्टच्या राम मंदिरास त्यांनी भेट दिली. त्या ठिकाणी ब्रिजेंद्र किल्लावाला व सहकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. श्रीराम जनमानस मंडळीच्या हनुमान जयंती उत्सवातही खासदार बारणे यांनी हजेरी लावली. मुख्य संयोजक राजेश शर्मा, राजू बारसकर, परमेश्वर ठाकूर यांनी त्यांचा सत्कार केला व निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या.

# तुमचे मत इतिहास घडविणारे ठरणार

## मावळ लोकसभेतून संजोग वाघेरेंना विजयी करा : आदित्य ठाकरे

**पुणे | प्रतिनिधी**

देशात ते चारशेपार म्हणत असले, तरी भाजप दोनशे देखील पार करणार नाही. भाजपला, गद्दारांना, महाराष्ट्र व्देष करणा-यांना मतदान करणार नाही, ही भूमिका आज मतदार घेत आहेत. तुमचे एक मत इतिहास घडविणारे आणि देशातील सरकार बदलणारे ठरणार आहे. देशातील अंधकार दूर करण्यासाठी मावळ लोकसभेतून मशाल चिन्हासमोरील बटण दाबून संजोग वाघेरे यांना विजयी करा, असे आवाहन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) युवा सेनेचे प्रमुख आदित्य ठाकरे यांनी केले.



मावळ लोकसभा मतदारसंघासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांचा उमेदवारी अर्ज आज, मंगळवारी दाखल करण्यात आला. त्यावेळी काढण्यात आलेल्या पदयात्रेत महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सभेला संबोधित केले. त्यामुळे आदित्य ठाकरे बोलत होते. मावळ लोकसभेत संजोग वाघेरेंना विजयी करण्याची जबाबदारी मतदारांनी घेतलेल्याचे सांगत आदित्य ठाकरे पुढे म्हणाले की, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष हा जनतेची आणि कार्यकर्त्यांची काळजी घेतली पाहिजे, हा विचार घेऊन पुढे जातो. देशात परिवर्तन होणार आहे. भाजपचे सरकार परत येणार नाही. अबकी बार, भाजपा तडीपार करण्याची गरज सर्वांच्या लक्षात आलेली आहे.

युवकांचे रोजगार हिरावले. गद्दारांच्या सरकार आल्यावर एकही नोकरीची संधी आलेली नाही. गुजरातला विरोध नाही, पण महाराष्ट्र, आसाम, केरळ, मणिपूर सर्वांना हक्काचे जे असेल ते मिळाले पाहिजे. ज्या राज्यात गुंड मंत्रालयात रील काढतात. तिथे कोणाला सुरक्षित वाटत नाही. बलात्कार करणाऱ्या प्रत्येकाला फाशी झाली पाहिजे, ही बाळासाहेब ठाकरे यांची शिकवण आपल्याला आहे. मात्र, भाजपकडून बलात्का-यांना वाचविण्याचे काम केले जाते. महिला वर्ग भाजपला मतदान करणार नाही. महागाईमुळे गरिबांना जगणे मुश्कील झाले आहे. शेतकरी, महिला, युवा, गरिब या वर्गाला देशोधडीला लावण्याचे काम केंद्र व राज्य सरकारने केले. कृषीमंत्र्याचे नाव देखील माहित नाही. पुढचे पाच वर्षे हे सरकार पडणार नाही. उद्धव ठाकरे साहेबांनी महाविकास आघाडीच्या सरकार असताना कर्जमाफी दिली. भाजपने शेतकऱ्यांवर लाठ्या-काठ्या चालविल्या, अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली.

खासदार डॉ. अमोल कोल्हे म्हणाले, शिवसैनिक निखा-यासारखा असतो. तो पेटून उठला, तर तो विजत नाही. आदिलशाहीला न जुमानता वतनावर पाणी सोडून कान्होजीराजे जैधे स्वराज्यासोबत राहिले. म्हणून त्यांच्या निष्ठेचा इतिहास सांगितला जातो. हनुमानाने शेपटीची मशाल करून रावणाची लंका दह न करण्याचे काम केले. जो कोणी देशाला मातृभूमी मानतो. त्या सर्वांची ही निवडणूक आहे.

गद्दारांना धडा शिकविण्यासाठी आणि भाजपला जागा दाखविणारी ही लढाई आहे. कोणी काही सोयीचे राजकारण केले, तरी आपण निष्ठा सोडणार नाही. भाजपने २०१४ नंतर कंपन्या आणल्या नाहीत. पण, हक्काचा उद्योग गुजरातमध्ये गेला. इथल्या खासदारांनी काय केले ? एकजुटीने आपलं ठरलंय, संजोग वाघेरे यांना खासदार करायचंय, असा नारा देत संजोग वाघेरेंना शहरातून तीन लाखांचे मताधिक्य द्या, असे आवाहन रोहित पवारांनी केले.

### दहा वर्षांत जे झाले नाही, ते पाच वर्षांत करून दाखवू

» उमेदवार संजोग वाघेरे पाटील आपल्या भाषणात म्हणाले, विशाल रॅलीच्या निमित्ताने उपस्थित जनसमुदाय पाहून गद्दारी करणाऱ्यांना जनता गाडून टाकणार आहे, हे निश्चित झालेले आहे. आपण सर्व जण मिळून या निवडणुकीत पक्षाला आणि उद्धव साहेबांना यातना देणा-यांचा बदला घेणार आहोत. त्यांना त्यांची जागा दाखवून देवू. जे दहा वर्षांत मावळ लोकसभा मतदारसंघात झाले नाही, ते काम पुढच्या पाच वर्षांत करून दाखवू. मशाल चिन्ह येत्या १३ मेला मेला इतिहास घडविणार आहे.

# जाहिरात फलकांची 15 दिवसांत तपासणी करा

## अवकाळी पावसाच्या पार्श्विभूमीवर प्रशासनाचे आदेश, जीवितहानी होण्याचीही शक्यता

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात दरवर्षी पावसाळ्यापूर्वी मे महिन्यात वादळी वाऱ्यासह पूर्वमोसमी पाऊस होतो. या पावसाने मोठ्या प्रमाणात झाडे, तसेच होर्डिंग्ज (जाहिरात फलक) पडण्याच्या घटना घडतात. त्यामुळे वित्तहानी होण्यासह जीवितहानी होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.



त्यामुळे आकाशचिन्ह विभागाने १५ दिवसांच्या आत शहरातील सर्व जाहिरात फलकांची तपासणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश महापालिका आयुक्तांसह, आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून महापालिकेच्या पाच परिमंडळांना देण्यात आले आहेत. काही दिवसांपूर्वीच अवकाळी पावसाने वाघोली येथे मोठा जाहिरात फलक चारचाकी वाहनावर कोसळला होता. त्याची गंभीर दखल घेत प्रशासनाने हे काम तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत.

गेल्या काही वर्षांत शहरात पावसाळ्यात झाडे, तसेच जाहिरात फलक कोसळण्याच्या घटना वाढलेल्या आहेत. मागील वर्षी देहूरोड येथे जाहिरात फलक पडून काही नागारिकांचा मृत्यू झाला होता. त्यामुळे महापालिकेने दरवर्षी जाहिरात फलक नूतनीकरण परवाना देताना संबंधित जाहिरात फलकांचे महापालिकेने निश्चित करून दिलेल्या संस्थेच्या माध्यमातून स्ट्रक्चरल ऑडिट करणे बंधनकारक केले आहे.

जाहिरात फलकांच्या मालकांकडून ते करण्यात आले असून, ते महापालिकेसही सादर करण्यात येते. मात्र, त्यानंतरही दुर्घटना घडल्यास नुकसान टाळण्यासाठी आकाशचिन्ह विभागाच्या अभियंत्यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन ऑडिट रिपोर्टप्रमाणे जाहिरात फलक सुस्थितीत आहे की नाही, याची पहाणी करण्याच्या सूचना अभियंत्यांना देण्यात आल्या असून, त्याचा अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

### धोकादायक झाडांची 15 मे पूर्वी छाटणी

» जाहिरात फलकांसोबतच महापालिका हद्दीतील धोकादायक झाडांच्या फांद्या, तसेच धोकादायक झालेली झाडे १५ मे पूर्वी छाटणी करून त्याचा अहवाल सादर करण्याच्या सूचना उद्यान विभागास देण्यात आल्या आहेत. मागील वर्षी पावसाळ्यात शहरात सर्वाधिक झाडे पडण्याच्या घटना घडल्या असून, त्याचे प्रमाण गेल्या काही वर्षांच्या तुलनेत अधिक आहे. त्यामुळे धोकादायक झाडांचे सर्वेक्षण करून, तसेच त्यासाठी आवश्यक असलेली मान्यतांची प्रक्रिया पूर्ण करून ती झाडे काढण्याचे आदेश देण्यात आले आहेत.